| MHKO160006112025 | <u>नियमित दिवाणी दावा क्र.१२७/२०२५ मधील</u><br><u>निशानी क्र. २७ वरील आदेश</u> |
|---|---|

०१. वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज आणि सोबतचे प्रतिज्ञापत्र दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ अन्वये वादपत्रमध्ये दुरूस्ती करण्यास परवानगी मिळण्यासाठी दाखल केला आहे.

०२. वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादींविरूध्द दावा मिळकतीचे सरसनिरसमानाने वाटप होऊन मिळणेकरिता व कायम मनाईकरीता तसेच हक्कज्ञापनाकरिता दाखल केला असून सदर दाव्याची चौकशी सुरू आहे. वादी यांनी सदर अर्जाद्वारे कथन केले आहे की, सदर दाव्याच्या टायटलमध्ये हक्कज्ञापनाचा यानंतर दावा प्रथम हक्काने खरेदी होवुन मिळणेबाबत अशी दुरूस्ती करणेस परवानगी मिळावी तसेच दाव्याची आकारणी रू.२००७.२० ऐवजी रू.१,५९,१४९ व ज्युरिसडीक्शनकरिता र.रू.२,४४०/- ऐवजी १०,०७०/- अशी दुरूस्ती करणेस परवानगी मिळावी. दावा अर्जी कलम १ मधील दावा मिळकतीचे वर्णन मध्ये जे वर्णन नमुद आहे ते १अ म्हणुन वाखाणण्यात यावे व १ब म्हणुन प्रतिवादी नं.१ यांनी दावा मिळकतीबाबत यातील प्रतिवादी नं.२ व ३ यांना दुय्यम निबंधकसो, करवीर ३ कोल्हापुर यांचेकडील रजिस्टर दस्त नं. ५३६५ दि.१६/०७/२०२५ रोजी करुन दिलेले रजिस्टर खरेदीपत्र १/७ हिस्सेने अग्रहक्काने खरेदी होवुन मिळावे असा मजकुर समाविष्ट करणेस परवानगी मिळावी असे कथन केलेले आहे.

०३. तसेच दावा अर्जी कलम ४ नंतर ४अ म्हणुन दावा मिळकत प्रथम अग्रहक्काने खरेदी घेणेचा वादी यांना अधिकार आहे. तेव्हा खरेदीपत्रात लिहिलेली बाजारभावाने किंमत १/७ हिस्सेने वादी देणेस तयार आहे व तसे खरेदीपत्र करुन द्या असे वादी यांनी म्हटल्यावर प्रतिवादी यांनी सर्वांनी त्यास स्पष्टपणे नकार दिला म्हणुन

वादीस प्रतिवादी यांचेकडुन दावा मिळकतीचे १/७ हिस्सेचे खरेदीपत्र होवुन मिळावे व त्यांनी तसे न केलेस ते मे. कोर्टामार्फत होवुन मिळावे याकरिता सदरचा दावा दाखल करणे भाग पडले आहे असा मजकुर समाविष्ट करणेस परवानगी मिळावी असे कथन केले आहे.

**०४.** तसेच ४ब म्हणुन यातील वादी यांना दावा मिळकती अग्रहक्काने खरेदी घेण्याचा कायदेशिर हक्क व अधिकार असताना तो डावलण्याच्या दृष्टीने प्रतिवादी नं.१ यांनी दावा मिळकतीबाबत यातील प्रतिवादी नं. २ व ३ यांना दुय्यम निबंधकसोा, करवीर ३ कोल्हापुर यांचेसमोर रजिस्टर दस्त नं. ५३६५ दि.१६/०७/२०२५ रोजी करुन दिलेले रजिस्टर खरेदीपत्र हे पुर्णत: चुकीचे व बेकायदेशिर आहे त्यामुळे सदरच्या तथाकथित खरेदीपत्रान्वये प्रतिवादी नं. २ व ३ यांना वादी यांचेविरुध्द कोणतेही कायदेशिर हक्क प्राप्त होत नाहीत. वादीने प्रथम अग्रहक्काने दावा मिळकती खरेदी घेण्याची इच्छा दर्शवलेमुळे बॅलन्स व कन्व्हीनिअन्स, इक्वीटी, नॅचरल जस्टीस, गुड कनसायन्स हे वादीचे बाजुने आहे असा मजकुर समाविष्ट करणेस परवानगी मिळावी असे कथन केले आहे.

**०५.** तसेच त्या अनुषंगाने दावेचा तपशील, दावेची आकारणी यामध्ये आवश्यक त्या दुरूस्ती करणेस परवानगी मिळावी अशी विनंती केलेली आहे. नमुद केलेप्रमाणे दुरूस्ती करणेस परवानगी मिळाल्यास प्रतिवादी यांचे कोणत्याही प्रकारचे नुकसान होण्याचा संभव नाही.तसेच वादींनी दुरूस्ती करणेमध्ये कोणताही हलगर्जीपणा अगर निष्काळजीपणा केलेला नव्हता व नाही. वादी व प्रतिवादी यांचेमध्ये असलेल्या वादावर अंतिमपणे पडदा टाकणेसाठी वादी यांना वर नमुद केल्याप्रमाणे दुरूस्ती करणेस परवानगी मिळणे आवश्यक आहे. सबब, वादींचा प्रस्तुतचा अर्ज मंजुर करणेत यावा.

**०६.** प्रतिवादी यांनी नि. ३० वर त्यांचे म्हणणे सादर केलेले आहे व वादीचा सदरचा अर्ज हा खोटा चुकीचा असल्याने त्यांना मान्य नसल्याचे कथन केले आहे. वादीने कथन केलेला मजकुर हा न्यायालयाची दिशाभुल करणारा आहे. वस्तुत: वादीने

मागितलेप्रमाणे हिस्सा मिळणेस वादी पात्र नसुन प्रतिवादी नं.१ यांना अन्य दोन बहिणी असल्यामुळे वादीचा हिस्सा अत्यंत नगण्य येत आहे. तसेच वादीने मागितलेल्या मागणीप्रमाणे दाव्याचे कॉज ऑफ ॲक्शन बदलणार असल्याने सदरची दुरूस्ती बेकायदेशिर आहे. वादीने मुळ दाव्यात मिळकतीच्या वाटणीचा दावा दाखल केला आहे परंतु सदर दुरूस्ती अर्जाद्वारे ती मिळकत अग्रहक्काने खरेदी करण्याचा अधिकार मागत आहेत. जो मुळ दाव्याच्या चौकटीबाहेरचा व नविन स्वरूपाचा आहे. दिवाणी प्रक्रिया संहिता ऑर्डर ६ रूल १७ नुसार दुरूस्ती केवळ तेव्हाच ग्राह्य धरली जाते जेव्हा ती दाव्याच्या स्वरूपात आमुलाग्र बदल करत नाहीत. सदर दुरूस्तीमुळे दाव्याचे स्वरूप पुर्णपणे बदलणार आहे. वादीने सदर मिळकतीवर कोणत्याही कायद्याने अग्रहक्क दाखवलेला नाही ना त्या संदर्भात कोणतेही करार, पुरावे किंवा कायदेशिर आधार सादर केले आहेत. त्यामुळे वादीचा असा हक्क अस्तीत्वात नाही. वादीचा मुळ दावा वाटपाचा असुन सदरच्या अग्रहक्काने खरेदीच्या दुरूस्तीनुसार वादी सदर दाव्यात स्पेसिफिक परफॉर्मन्स प्रमाणे हक्क मागत आहेत जो की या दाव्याचा भाग नाही. त्यामुळे वादीच्या सुरुवातीची व आत्ताची भुमिका विसंगत अशी आहे. वादीचा प्रस्तुतचा अर्ज निव्वळ खोट्या मजकुराचा आधार घेवुन सदर दाव्यास विलंब करण्याच्या हेतुने दाखल केलेला आहे. त्यामुळे वादीचा प्रस्तुतचा अर्ज नामंजुर होणेस पात्र आहे.

**०७.** मी वादी, प्रतिवादीं याचे विधिज्ञांचा युक्तीवाद ऐकला, अभिलेखावरील दाखल सर्व कागदपत्रे यांचे अवलोकन केले आहे. वादी यांनी प्रस्तुतचा दावा हा वाटपाकरीता व कायम मनाईकरीता तसेच हक्कज्ञापनाकरिता दाखल केला आहे. अभिलेखावरील कागदपत्रांचे अवलोकन केले असता वादी यांचे वडील प्रतिवादी नं. १ यांना प्रतिवादी नं. २ व ३ यांचे लाभार्थ खरेदीपत्र करुन दिल्याचे दिसुन येते. सदरचे खरेदीपत्र करुन देण्याचा वादी यांना अधिकार होता अथवा नाही हे दाव्याच्या अंतिम निकालावेळी ठरवण्यात येईल. सद्यस्थितीत वादी मागणी करत असल्याप्रमाणे दुरूस्ती केल्यास दाव्यातील गुंतागूंत वाढेल असे प्रथमदर्शनी दिसुन येत नाही. याउलट वादी व प्रतिवादी यांच्यात उत्पन्न होणारे भविष्यातील वाद व वेगवेगळे दावे रोखण्यासाठी सदरच्या दुरूस्तीमुळे टाळता येतील. दोन्ही पक्षकारांमधील सर्व वादमुद्दे निकाली

निघण्यासाठी सदरची दुरूस्ती करणे न्यायाच्या गरजेचे आहे. सबब, वर नमूद निष्कर्षास अनुसरून मी खालील आदेश करीत आहे.

<u>**आदेश**</u>

**०१** अर्ज नि.२७ चा अर्ज र.रू.३००/-चे कॉस्टवर वादीने प्रतिवादींना देण्याचे अटीवर मंजूर करण्यात येत आहे.

**०२.** वादी यांनी अर्जामध्ये नमूद वादपत्रामधील दुरूस्ती १४ दिवसांचे आत करावी आणि दावा दुरूस्त प्रत न्यायातयात दाखल करावी.

Digitally signed by Shraddha Dinkar Bagal

**दिनांक- १८/११/२०२५**

**( एस. डी. बागल )**
**सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर,**
**मलकापूर-शाहूवाडी, जि. कोल्हापुर.**